तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, १२ मार्च २०२५

आतील पानावर
पान २ – क्रिती सेनॉनचं यंदा कर्तव्य आहे ?
पान ३ – 'रेस ४'मध्ये दिसणार रकुल
पान ४ – साई पल्लवीचा 'हा' चित्रपट पाहून ...
पान ६ – पहिल्यांदाच आयटम साँगमध्ये...
पान ७ – आलियाची आहे शाहरुखसोबत काम...

## अभिषेकच्या 'बी हॅप्पी'चा मजेशीर ट्रेलर रिलीज

अभिनेता अभिषेक बच्चनने त्याच्या करिअरमध्ये आतापर्यंत अनेक वेगवेगळ्या भूमिका साकारल्या आहेत. अभिषेकच्या मागील चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर फारशी कमाई केली नसली तरीही त्याच्या भूमिकांचे कौतुक झाले. आता लवकरच अभिनेता वेगळ्या भूमिकेत दिसणार आहे. अभिषेकच्या 'बी-हॅप्पी' या चित्रपटाचा ट्रेलर समोर आला आहे. डान्स रिॲलिटी शोवर आधारित 'बी-हॅप्पी' या चित्रपटात अभिषेक बच्चन मुख्य भूमिकेत दिसणार आहे. यासोबतच नोरा फतेहीही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटात अभिषेक डान्सची आवड असलेल्या एका मुलीच्या वडिलांच्या भूमिकेत दिसणार आहे. ॲमेझॉन प्राइम व्हीडिओकडून चित्रपटाचा ट्रेलर सोशल मीडियावर शेअर करण्यात आला आहे. २ मिनिटांच्या या मजेशीर ट्रेलरमध्ये बाप-लेकीची गोष्ट दाखवण्यात आली आहे. मुलीच्या नृत्याचे स्वप्न बाप कशाप्रकारे पूर्ण करतो, याची कहाणी या चित्रपटामध्ये पाहायला मिळणार आहे. चित्रपटाच्या मजेशीर ट्रेलरला प्रेक्षकांचीही पसंती मिळत आहे. ट्रेलरपाहून प्रेक्षकांची चित्रपट पाहण्याची उत्सुकता वाढली आहे. 'बी-हॅप्पी' हा चित्रपट १४ मार्चला ओटीटी प्लॅटफॉर्म ॲमेझॉन प्राइम व्हीडिओवर रिलीज होणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन डान्स मास्टर आणि प्रसिद्ध कोरिओग्राफर रेमो डिसूझाने केले आहे. याआधी रेमो डिसूझाने 'एबीसीडी: एनी बॉडी कॅन डान्स', 'एबीसीडी २' आणि 'स्ट्रीट डान्सर' यांसारखे डान्सवर आधारित चित्रपट प्रेक्षकांसाठी आणले होते. आता रेमो डिसूझाचा 'बी-हॅप्पी' हा आणखी एक डान्सवर आधारित चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीसाठी येत आहे.





# मिका सिंगचा बिपाशा बासूवर निशाणा



बॉलिवूड अभिनेत्री बिपाशा बासू सध्या सिने इंडस्ट्रीपासून दूर असल्याचे दिसत आहे. यावरून आता गायक मिका सिंगने बिपाशाला टोला लगावला आहे. ती तिच्या कर्मामुळेच घरी बसली असल्याचे मिकाने बिपाशाला म्हटले आहे. वास्तविक, मिका सिंगसोबत करण आणि बिपाशाचा जुना वाद आहे. त्यावरून आता मिकाने पुन्हा एकदा बिपाशावर टीका केली आहे. एका मुलाखतीत मिकाला बिपाशाला काम का मिळत नाही? असा प्रश्न करण्यात आला. त्यावर मिका म्हणाला, देव सगळं बघत आहे. मला करणला घेऊन सिनेमा प्रोड्युस करायचा होता. याचं बजेट जवळपास ४ कोटी होतं. बिपाशाला मी घेणार नव्हतो पण ती बळजबरी या सिनेमाचा भाग बनली.

लंडनमध्ये सिनेमाचं शूट होतं. ४ कोटींचं बजेट १४ कोटींवर गेलं. मला आर्थिक चिंता होती. बजेट वाढण्याचं खरं कारण सेटवर आल्यावर मला कळालं. बिपाशा अजिबातच सहकार्य करत नव्हती. तिचे नखरे पाहून मला निर्मितीमध्ये यायचा पश्चात्ताप होत होता. पती-पत्नी असूनही त्यांनी रोमँटिक सीन्स द्यायलाही नकार दिला. तो पुढे म्हणाला, यामध्ये एक किसींग सीन होता. हा कथेचाच भाग होता. पण बिपाशाने ऐनवेळी नकार दिला. ज्या अभिनेत्रींजवळ काम नाही ते नेहमीच नशिबाला दोष देतात. पण जे काम घेऊन आलेत त्या निर्मात्यांचाही आदर केला पाहिजे. आज तिला तिच्या कर्माचंच फळ मिळत आहे म्हणून घरी बसली आहे, असा थेट हल्लाबोल मिकाने बिपाशावर केला.

दरम्यान, मिका सिंह निर्मित 'डेंजरस' ही वेबसीरिज २020 मध्ये बिपाशा बसू आणि करण सिंह ग्रोवरने केली होती. त्यानंतर बिपाशा कोणत्याच प्रोजेक्टमध्ये दिसली नाही. ती सोशल मीडियावर सक्रिय असल्याचे पाहायला मिळते.

# क्रिती सेनॉनचं यंदा कर्तव्य आहे?

बॉलिवूडची अभिनेत्री क्रिती सेनॉन डिसेंबर २०२५ मध्ये तिच्या बहुचर्चित बॉयफ्रेण्ड सोबत लग्न करणार असल्याच्या चर्चेला उधाण आले होते. क्रितीचा बॉयफ्रेण्ड बिझनेसमन कबीर बहिया सोबत ती अनेक कार्यक्रमांमध्ये दिसली. त्यामुळे त्यांच्या लग्नाच्या चर्चा जोरदार सुरू होत्या. काही दिवसांपूर्वी क्रिती दिल्ली विमानतळावर बॉयफ्रेण्ड कबीर सोबत दिसली होती. यानंतर दोघांनी ख्रिसमस व्हेकेशनस् एकत्र साजऱ्या केल्या असल्याचे रुमरही पसरले होते. अशातच क्रितीच्या निकटवर्तीयांकडून मिळालेल्या माहितीनुसार, क्रितीच्या२०२५ इयर प्लॅनमध्ये लग्न या विषयाची नोंदणीसुद्धा नाही आहे. हे संपूर्ण वर्ष क्रिती तिच्या नवनवीन प्रोजेक्टमध्ये बिझी असणार आहे. सध्या क्रिती दिल्लीमध्ये शुटींग करत आहे. आनंद एल राय यांच्या आगामी सिनेमाचे शुटींग दिल्लीमध्ये सुरू आहे. या सिनेमाच्या शुटींगनंतर क्रितीने पुढच्या प्रोजेक्टस् च्या तारखा दिलेल्या आहेत. तिच्याकडे शुटींग स्केड्युल दरम्यान ब्रेक घेण्यासाठीही वेळ नसल्याचीही माहिती समोर आली. क्रिती सेनॉनचा तेरे इश्क में सिनेमाचा टिझरला लोकांनी चांगला प्रतिसाद दिला आहे.





# मला टीका केलेली आवडते

जॉन अब्राहमला बॉलिवूडमध्ये काम करायला सुरुवात करून बराच काळ झाला आहे. तो ॲक्शन, रोमँटिक, ड्रामा अशा सर्व प्रकारच्या चित्रपटांचा भाग राहिला आहे. लवकरच त्यांचा एक चित्रपट 'डिप्लोमॅट' प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटासंदर्भात दिलेल्या मुलाखतीत जॉन अब्राहमने त्याच्या कारकिर्दीत झालेल्या टीकेबद्दल सांगितले. माध्यमांशी बोलताना जॉन अब्राहमने सांगितले की, त्याच्या कारकिर्दीत त्याला खूप टीकेचा सामना करावा लागला आहे. या टीकेमुळे त्याचे करिअर घडले आहे असे त्याचे मत आहे.

जॉन म्हणतो, 'माझी कारकीर्द टीकेवर आधारित आहे, मी ती एन्जॉय केली आहे.' जॉन अब्राहम पुढे म्हणतो, 'ज्यांनी मला पुढे जाण्यास प्रेरित केले ते माझे प्रेक्षक आहेत. 'डिप्लोमॅट' चित्रपटाबद्दल तो खूप आनंदी आहे, त्याला या चित्रपटाशी एक वेगळ्या प्रकारचे नाते वाटते. हा चित्रपट १४ मार्च २०२५ रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात जॉनने खऱ्या राजनयिक जेपी सिंगची भूमिका साकारली आहे. एका मुलाखतीत अभिनेता जॉन अब्राहमनेही शाहरुख खान स्टारर 'पठाण' चित्रपटाबाबत अपडेट दिले. जॉनने या चित्रपटाचा प्रीक्वल बनवण्याबद्दल बोलले होते. तो म्हणतो, 'मी फ्रँचायझी चित्रपटाचा भाग तेव्हाच बनतो जेव्हा त्यातील माझे पात्र खास असते.' 'पठाण' चित्रपटातील माझी जिमची भूमिका खूपच छान, खास होती.' तो पुढे म्हणतो, 'आदित्य चोप्राने पठाणचा प्रीक्वल बनवायला हवा. यामध्ये माझ्या जिम या पात्राची मागची कहाणी काय आहे ते दाखवता येईल. आशा आहे की आपण या चित्रपटाचा प्रीक्वल बनवू. 'डिप्लोमॅट' चित्रपटाव्यतिरिक्त, जॉन अब्राहम इतर काही चित्रपटांमध्येही काम करत आहे. यामध्ये 'तेहरान' आणि 'तारिक' सारखे चित्रपट देखील समाविष्ट आहेत. जॉन निर्माता म्हणूनही या चित्रपटांशी संबंधित आहे.



# महिमा चौधरी लवकरच दिसणार नव्या भूमिकेत

बॉलीवूड अभिनेत्री महिमा चौधरीच्या चित्रपट कारकिर्दीची सुरुवात १९९७ मध्ये 'परदेस' चित्रपटाने झाली. या चित्रपटाने तीला एका रात्रीत स्टार बनवले. तेव्हापासून, महिमाने अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे. गेल्या काही वर्षांत, ती मोठ्या पडद्यावर वेगवेगळ्या भूमिकांमध्ये दिसली आहे आणि तिने तिच्या कारकिर्दीची दुसरी इनिंग देखील सुरू केली आहे. महिमा चौधरीच्या काही लोकप्रिय चित्रपटांबद्दल आणि पात्रांबद्दल जाणून घ्या. इब्राहिम अली खान आणि खुशी कपूर यांचा 'नादानियां' हा चित्रपट लवकरच ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात महिमा चौधरी देखील दिसणार आहे. या चित्रपटात ती खुशी कपूरच्या आईची भूमिका साकारत आहे. या चित्रपटात महिमाच्या विरुद्ध सुनील शेट्टी आहे. हा चित्रपट करण जोहरच्या प्रॉडक्शन हाऊस अंतर्गत बनवण्यात आला आहे. 'नादानियां' चित्रपटात महिमा चौधरी एका आईच्या भूमिकेत दिसणार आहे. पण कंगना राणौतच्या 'इमर्जन्सी (२०२५)' या चित्रपटात त्याने एक दमदार भूमिका साकारली. या चित्रपटात ती प्रसिद्ध लेखिका आणि कार्यकर्ते पुपुल जयकर यांच्या भूमिकेत दिसली होती. पुपुल जयकर हे इंदिरा गांधींचे जवळचे मित्र होते. या चित्रपटात कंगना राणौत माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या भूमिकेत दिसली होती, तिने या चित्रपटाचे दिग्दर्शनही केले होते. २०२४ मध्ये अनुपम खेर यांनी 'सिग्नेचर' हा भावनिक नाट्यमय चित्रपट केला. या चित्रपटाचे दिग्दर्शन गजेंद्र अहिरे यांनी केले होते. या चित्रपटात महिमा चौधरीने अंबिका नावाच्या महिलेची भूमिकाही साकारली होती. 'सिग्नेचर' हा चित्रपट महिमा चौधरीसाठी एक खास चित्रपट होता कारण त्याद्वारे तिने जवळजवळ ९ वर्षांनी मोठ्या पडद्यावर पुनरागमन केले. महिमा चौधरीचे हे पुनरागमन देखील खास होते कारण ती कर्करोगाविरुद्धची लढाई जिंकल्यानंतर प्रेक्षकांसमोर आली होती. ती सर्वांसाठी प्रेरणा बनली. महिमा चौधरीने तिच्या कारकिर्दीची एक नवीन इनिंग सुरू केली असेल, पण आजही प्रेक्षक तिला तिच्या जुन्या चित्रपटांमुळे आणि पात्रांमुळे जास्त ओळखतात. विशेषतः महिमाने तिच्या पहिल्या चित्रपट 'परदेस (१९९७)' मधील गंगाची भूमिका अजूनही प्रेक्षकांच्या मनात जिवंत आहे. या चित्रपटात तिच्या विरुद्ध शाहरुख खान होता, हा चित्रपट सुभाष घई यांनी दिग्दर्शित केला होता.

# रकुल 'रेस ४'मध्ये दिसणार



बॉलिवूड अभिनेता सैफ अली खान लवकरच 'रेस ४' चित्रपटात दिसणार आहे. रेस फ्रँचाईजीच्या चौथ्या भागाची निर्माते रमेश तौरानी यांनी काही दिवसांपूर्वीच घोषणा केली होती. यात सैफ अली खानसह बॉलिवूड अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा दिसणार आहे. त्यामुळे या चित्रपटाची सर्वांनाचं फार उत्सुकता लागली आहे. यातच आता या चित्रपटातील एक अपडेट समोर आले आहे. यात आता नायिका म्हणून कोणाला पाहायला मिळणार ह्याची सध्या चर्चा सुरू होती. यावरून आता पडदा उठवला आहे. प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेत्रीची 'रेस ४' मध्ये वर्णी लागली आहे. अभिनेत्री रकुल प्रीत सिंग चित्रपटात मुख्य नायिकेच्या भूमिकेत दिसणार आहे. मात्र, याबाबत अधिकृत घोषणा अद्याप करण्यात आलेली नाही. समजा, ही माहिती सत्य असली तर सैफ अली खान, रकुल आणि सिद्धार्थ मल्होत्रा यांचे त्रिकुट चित्रपटात एकत्र पाहायला मिळणे, चाहत्यांसाठी एक वेगळी पर्वणी असेल. रकुल प्रीत सिंगच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या 'मेरे हसबैंड की बीवी' या चित्रपट रकुल दिसली होती. मात्र बॉक्स ऑफिसवर हा चित्रपट यशस्वी झाला नाही. पण या चित्रपटाला रकुल आणि अर्जुन कपूरची जोडी आवडली होती. या चित्रपटात भुमी पेडणेकर आणि स्टँडअप कॉमेडियन हर्ष गुजराल देखील पाहायला मिळाले होते.

# कियाराने 'हा' सिनेमा करण्यास दिला नकार



बॉलिवूड अभिनेत्री कियारा अडवाणी आणि तिचा पती सिद्धार्थ मल्होत्रा लवकरच आई-बाबा होणार आहेत. अलीकडेच सोशल मीडियाद्वारे त्यांनी ही बातमी चाहत्यांसोबत शेअर केली होती. मात्र, आता प्रेग्नेंसीमुळे तिने एक मोठा निर्णय घेतला आहे. फरहान अख्तर दिग्दर्शित 'डॉन ३' या चित्रपटातून किआरा बाहेर पडणार आहे. 'डॉन ३' चित्रपटात रणवीर सिंग आणि कियारा आडवाणी मुख्य भूमिकेत दिसणार होते. मात्र आता कियाराने हा चित्रपट करण्यास नकार दिला आहे. तिने काही काळ सिनेमापासून दूर राहत प्रेग्नेंसीवर लक्ष देण्याचा निर्णय घेतला आहे. अशा परिस्थितीत निर्मात्यांनी डॉन ३ साठी नवीन नायिका शोधण्यास सुरवात केली आहे. हा निर्णय कियारा आणि निर्मात्यांमधील परस्पर संमतीने घेण्यात आला आहे. मात्र अद्याप या वृत्ताला कियारा किंवा निर्मात्यांकडून दुजोरा मिळालेला नाही. सध्या कियारा यश स्टारर 'टॉक्सिक' आणि 'वॉर २'चे शूटिंग पूर्ण करण्याला प्राधान्य देणार असल्याचेही म्हटले जात आहे. दरम्यान, कियारा आणि सिद्धार्थने फेब्रुवारी २०२३ मध्ये राजस्थानच्या जैसलमेरमध्ये लग्न केले. त्यांचे लग्नादरम्यानचे फोटो तुफान व्हायरल झाले होते. लग्नाच्या दोन वर्षांनंतर कियारा अडवाणी आणि सिद्धार्थ मल्होत्रा यांनी २८ फेब्रुवारी रोजी त्यांच्या इन्स्टाग्रामवर पालक होणार असल्याची घोषणा केली होती. या जोडप्याने हातात बाळाचे मोजे धरलेले एक फोटो शेअर केला होता आणि कॅप्शनमध्ये लिहिले, 'आमच्या आयुष्यातील सर्वात मोठी भेट. लवकरच येत आहे.' ही खुशखबर ऐकल्यानंतर चाहत्यांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला होता.



# साई पल्लवीचा 'हा' चित्रपट पाहून रडला अभिनेता

दिग्दर्शक राजकुमार पेरियासामी दिग्दर्शित 'अमरन' हा चित्रपट लोकांना खूप आवडला होता. २०२४ मध्ये हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात शिवकार्तिकेयन आणि साई पल्लवी हे कलाकार मुख्य भूमिकेत होते. या चित्रपटात अभिनेता राहुल बोसनेदेखील काम केलं होतं. त्याने चित्रपटात कर्नल अमित सिंह डब्बास यांची भूमिका साकारली होती, जो मेजर मुकुंद वरदराजन (शिवकार्तिकेयन) यांचा कमांडिंग ऑफिसर होता. आता हा चित्रपट प्रदर्शित होऊन १०० दिवस पूर्ण झाले आहेत आणि त्यानिमित्त एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राहुल बोसने चित्रपट आणि त्यातील कलाकारांबद्दल अनेक गोष्टी शेअर केल्या. हा चित्रपट पाहून १०-११ वेळा रडल्याचं राहुल बोसने सांगितलं. राहुल बोस म्हणाला, ॲक्शन आणि प्रेम यांच्यातील दुवा इतक्या बारकाईने दाखवणारा असा कोणताही चित्रपट मी पाहिलाय, असं मला वाटत नाही. खरंच खूप दमदार ॲक्शन सीक्वेन्स आणि अतिशय भावनिकदृष्ट्या गुंतवून ठेवणारी प्रेमकथा एकत्र उलगडणं अवघड काम आहे. राजकुमार तुम्ही ते काम हुशारीने केलंय, तसेच अचूकपणे, संयमाने, शांततेने आणि पूर्ण आत्मविश्वासाने केलं आहे. राहुलने अभिनेता शिवकार्तिकेयनचं कौतुक केलं आणि म्हणाला, शिवकार्तिकेयन, तुझा अभिनय खूप चांगला आहे. जेव्हा एखादा अभिनेता पडद्यावर खरा असतो तेव्हा तुम्ही त्याच्यावरून नजर हटवू शकत नाही. ज्या क्षणी ते खोटे वाटतात, तेव्हा तुमचं त्यांच्याशी कनेक्शन तुटतं. मी दोनदा चित्रपट पाहिला आणि मी किमान १० ते ११ वेळा रडलो असेन. खरं तर मी क्वचितच रडतो. तू अविश्वसनीय आहेस. या चित्रपटात मी काम केलं, पण तुझ्याबरोबर सीन करण्याची संधी मिळाली नाही, पण मला आशा आहे की भविष्यात मला एखादा चित्रपट मिळेल ज्यात मी तुझ्याबरोबर एक-दोन सीन करेन, असं राहुल बोस साई पल्लवीबद्दल म्हणाला. या चित्रपटात मेजर मुकुंद (शिवकार्तिकेयन) आणि त्यांची पत्नी इंदू रेबेका वर्गीस (साई पल्लवी) यांचा प्रवास आणि काश्मीरमधील दहशतवादी हल्ल्यात त्यांचा मृत्यू दाखवण्यात आला आहे. हा चित्रपट हिंदी, तमिळ, तेलगू, मल्याळम आणि कन्नड भाषांमध्ये नेटफ्लिक्सवर उपलब्ध आहे.



# तमन्ना आणि विजय वर्माचं ब्रेक अप?

अभिनेत्री तमन्ना भाटिया आणि विजय वर्मा हे दोघंही एकमेकांना दोन वर्षांपासून डेट करत होते. मात्र आता या दोघांमधलं नातं संपुष्टात आलं असून त्यांनी फक्त चांगले मित्र म्हणून राहण्याचा निर्णय घेतला आहे. तमन्ना आणि विजय वर्मा यांच्या एका निकटवर्तीयाने सांगितलं की या दोघांचं ब्रेक अप झालं आहे. दोघांनी फक्त मैत्री कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. बाकी एकमेकांना डेट करणं थांबवलं असून प्रेमसंबंधही संपवले आहेत. लस्ट स्टोरीज २ या वेब सीरिजमध्ये या दोघांचा खूपच बोल्ड सीन होता. त्यावर चर्चाही सुरु झाल्या होत्या. ज्यानंतर या दोघांनीही म्हणजेच विजय वर्मा आणि तमन्नाने एकमेकांना डेट करत असल्याचं मान्य केलं होतं. तमन्ना भाटिया आणि विजय वर्मा अनेक कार्यक्रमांमध्ये एकत्र दिसायचे. तसंच पापाराझींना फोटोंसाठी पोजही द्यायचे. मात्र आता दोन वर्षांनी या दोघांचं नातं संपुष्टात आल्याची चर्चा रंगली आहे. अर्थात याबाबत तमन्ना किंवा विजय वर्मा कुणीही भाष्य केलेलं नाही. आता हे नातं संपल्याची घोषणा तमन्ना आणि विजय वर्मा याबाबत अधिकृत घोषणा कधी करणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे. विशेष म्हणजे त्यांनी आपलं नातं फार काळ लपवून ठेवलं नव्हतं. हे दोघेही प्रेमात फार पुढे गेले असून लवकरच ते लग्न करणार आहेत, असंही म्हटलं होतं. मात्र आता त्या दोघांनीही एकमेकांपासून वेगळं होण्याचा म्हणजेच ब्रेकअप करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती मिळते आहे. विशेष म्हणजे या दोघांनीही इन्स्टाग्रामवरून सोबतचे फोटोही डिलीट केले आहेत. त्यामुळे या दोघांच्या ब्रेक अपच्या चर्चा सुरु झाल्या आहेत.

# मला 'लेडी सुपरस्टार' म्हणू नका

दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील आघाडीची अभिनेत्री नयनतारा जगभरात प्रसिद्ध आहे. सौंदर्य आणि अभिनयाच्या जोरावर तिने आपलं वेगळं स्थान निर्माण केलं आहे. तिची नुकतीच नेटफ्लिक्सवर 'नयनतारा' ही डॉक्युमेंटरी आली ज्यामध्ये तिच्या आयुष्यातील सर्वच क्षण दाखवण्यात आले आहेत. नयनताराने २०२३ साली थेट शाहरुख खानसोबत 'जवान' सिनेमातून बॉलिवूडमधून पदार्पण केलं. म्हणूनच नयनताराचा चाहतावर्ग तिला 'लेडी सुपरस्टार' म्हणतो. पण आता नयनताराने चाहत्यांना या नावाने न संबोधण्याची विनंती केली आहे.

नयनताराने सोशल मीडियावर एक सर्क्युलर जारी केलं. यामध्ये ती लिहिते, प्रिय चाहत्यांनो, पत्रकार मित्रांनो, एक अभिनेत्री म्हणून मला या प्रवासात जे यश मिळालं आणि आनंद मिळाला त्यासाठी मी मनापासून सर्वांची आभारी आहे. माझं आयुष्य तर खुलं पुस्तकच आहे ज्यामध्ये तुमचं नि:स्वार्थी प्रेम आणि जिव्हाळा आहे. यश मिळाल्यावर माझ्या पाठीवर कौतुकाची थाप देणं असो किंवा कठीण काळात मला पुन्हा वर येण्यासाठी हात देणं असो, तुम्ही प्रत्येक पावलावर माझ्यासोबत होतात. तुमच्यापैकी अनेकजण मला 'लेडी सुपरस्टार' असं संबोधतात. हे तुमच्या प्रेमातूनच आलेलं नाव आहे. तुम्ही इतकं किंमती टायटल मला दिलंत त्यासाठी मी तुमची ऋणी आहे. तथापि माझी तुम्हाला प्रामाणिक विनंती आहे की तुम्ही मला 'नयनतारा'च म्हणा. कारण हे नाव माझ्या हृदयाच्या खूप जवळ आहे. अभिनेत्री म्हणून नाही तर एक माणूस म्हणून सुद्धा हे नाव माझं व्यक्तिमत्व दर्शवतं. नाव आणि प्रशंसा याची किंमत मोजता येत नाही पण काहीवेळेस हीच प्रतिमा बनून जाते जी कलाकारांना त्यांच्या कामापासून आणि तुम्हा दर्शकांपासून वेगळी करते. मला विश्वास आहे तुमचं प्रेम कायम माझ्यासोबत राहील. भविष्य कोणीही पाहिलेलं नाही पण तुमचा पाठिंबा माझ्यासोबत कायम असेल याचा मला आनंद आहे. तुमच्या मनोरंजनासाठी मी कायमच मेहनत घेत राहील. सिनेमा आपल्याला जोडतो त्यामुळे तो साजरा करत राहुया...








# आयुषमानसोबत दिसणार शर्वरी रोमांस करताना

चित्रपट दिग्दर्शक सूरज बडजात्या लवकरच एक नवीन प्रोजेक्ट घेऊन येत आहेत ज्यासाठी ते स्टार्सच्या शोधात होते. त्यांनी आयुषमान खुराणाला त्याच्या आगामी प्रोजेक्टसाठी साइन केले आहे आणि आता सूरज बडजात्या यांना त्यांची हिरोईन सापडल्याची बातमी समोर येत आहे. या फ्रेश जोडीसोबत ते एक नवा रोमँटिक सिनेमा बनवणार आहेत. त्यांनी मुंज्या फेम शर्वरी वाघला आयुषमानसोबत कास्ट केले आहे. माधुरी दीक्षित, करीना कपूर, भाग्यश्री यांसारख्या नायिकांच्या करिअरला चालना देणारे चित्रपट दिग्दर्शक सूरज बडजात्या लवकरच एका नव्या अभिनेत्रीसोबत आपला प्रोजेक्ट सुरू करत आहेत. सूरज बडजात्या यांनी शर्वरी वाघला त्यांच्या आगामी चित्रपटासाठी साइन केले आहे. या चित्रपटात ती आयुषमान खुराणासोबत दिसणार आहे. ते एक प्रेमकथा बनवत आहेत ज्यासाठी ते शर्वरी आणि आयुषमान ही फ्रेश जोडी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. मात्र, या चित्रपटाचे नाव अद्याप समोर आलेले नाही. हे दोघे मोठ्या पडद्यावर एकत्र येतात का हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. आयुषमान खुराणाच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचे झाले तर, तो लवकरच सारा अली खानसोबत छोटी सी बातच्या रिमेकमध्ये दिसणार आहे, याशिवाय त्याच्याकडे एक हॉरर कॉमेडी सिनेमा आहे. तर शर्वरी वाघ अल्फामध्ये आलिया भटसोबत दिसणार आहे.




# २२ मराठा बटालियन – गोष्ट 'गनिमी काव्याची' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला

मराठा बटालियनच्या शौर्यगाथेवर भाष्य करणारा '२२ मराठा बटालियन- गोष्ट गनिमी काव्याची' २०२५ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतीच या चित्रपटाची सोशल मीडियावर घोषणा करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एक पराक्रमी योद्धेच नव्हते तर कुशल युद्धनीतीकारही होते. त्यांच्या युद्धशैलीत गनिमी कावा' या विशेष तंत्राचा उपयोग करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या गनिमी कावा तंत्राचे हे विविध पैलू या चित्रपटाच्या निमित्ताने प्रेक्षकांपर्यंत पोहोचणार आहेत. नुकत्याच झळकलेल्या पोस्टरने रसिकांमध्ये चित्रपटाबद्दल प्रचंड उत्सुकता निर्माण केली आहे. नजरेत भरणारे दाट जंगल आणि त्यात झळकणारा '२२ मराठा बटालियन' हा शब्द प्रेक्षकांना चित्रपटाच्या कथानकाबद्दल नक्कीच विचार करायला लावेल. अद्वितीय साहस, गनिमी काव्याची रणनिती हे सगळे या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. चित्रपट म्हणजे प्रेक्षकांसाठी एक रोमांचक अनुभव ठरेल, यात शंकाच नाही. दिग्दर्शक प्रकाश जनार्दन पवार म्हणतात, '२२ मराठा बटालियन' हा चित्रपट म्हणजे शौर्य आणि रणनीतीचा जगासमोर आलेला एक इतिहास आहे. गनिमी कावा हे केवळ एक युद्धतंत्र नव्हते तर ती एक रणनिती होती. शत्रुला हरवण्याची. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज एक यशस्वी योद्धा ठरले. हेच या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. या चित्रपटात अनेक तगडे कलाकार आहेत. त्यामुळे चित्रपटाची उंची अधिक वाढलीय. आम्हाला आशा आहे की, हा चित्रपट प्रेक्षकांच्या नक्कीच पसंतीस उतरेल. शकुंतला क्रिएशन प्रॉडक्शन आणि एस आर फिल्म्स प्रस्तुत या चित्रपटाची कथा आणि दिग्दर्शन प्रकाश जनार्दन पवार यांनी केले असून रुपेश दिनकर आणि संजय बाबुराव पगारे यांनी निर्मितीची जबाबदारी सांभाळली आहे. या चित्रपटाची पटकथा व संवाद निलेश महिगावकर यांनी लिहिले आहेत. चित्रपटात प्रवीण तरडे, प्रसाद ओक, अशोक समर्थ, पुष्कर जोग, सोमनाथ अवघडे, अभिनय बेर्डे, उत्कर्ष शिंदे, यश डिंबळे, सपना माने, टिशा संजय पगारे, अमृता धोंगडे, शिवाली परब, आयुश्री पवार अशी तगडी स्टारकास्ट पाहायला मिळणार आहे. '२२ मराठा बटालियन- गोष्ट गनिमी काव्याची' हा चित्रपट मराठी आणि हिंदी भाषेत प्रदर्शित होणार आहे.

# पहिल्यांदाच आयटम साँगमध्ये अमृता



बाहुबली अभिनेता स्वप्नील जोशीचे एकामागोमाग एक अनेक हटके चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. काही दिवसांपूर्वीच स्वप्नीलची प्रमुख भूमिका असलेले 'जिलबी' आणि 'चिकी चिकी बुबूम बुम' हे चित्रपट बॉक्स ऑफिसवर रिलीज झाले आहेत. आता अभिनेता 'सुशीला- सुजीत' एका चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. नुकतेच या चित्रपटातील नवीन गाणे रिलीज झाले आहे. 'सुशीला- सुजीत' चित्रपटातील चिऊताई चिऊताई दार उघड हे गाणे प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. विशेष म्हणजे या आयटम साँगमध्ये लोकप्रिय अभिनेत्री अमृता खानविलकर हटके अंदाजात दिसत आहे. अमृताने तिच्या अभिनय प्रवासात पहिल्यांदाच आइटम साँगमध्ये काम केले आहे. अमृतासोबत या गाण्यात अभिनेता गश्मीर महाजनी देखील आहे. आतापर्यंत सुपरहिट लावण्या सादर केल्यानंतर आता अमृता पहिल्यांदाच 'चिऊताई चिऊताई दार उघड' या आयटम साँगच्या माध्यमातून वेगळ्या रुपात प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे.' सुटता सुटेना बंद दारामागची कोडी, भन्नाट स्वॅग घेऊन आलीये गश्मीर- अमृताची जोडी', अशा मजेशीर कॅप्शनसह अमृताने या गाण्याचा व्हीडिओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. या गाण्यातील अमृताचा हटके लूक प्रेक्षकांना देखील आवडला आहे. या आयटम साँगद्वारे अमृता प्रेक्षकांचे मन जिंकत आहे. दरम्यान, अभिनेता स्वप्नील जोशी आणि अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांची प्रमुख भूमिका भूमिका असलेला 'सुशीला- सुजीत' १८ एप्रिलला मोठ्या पडद्यावर रिलीज होणार आहे. सिनेमाची निर्मिती ही स्वप्नील जोशी याच्यासह मंजिरी व प्रसाद ओकनं केली आहे. तर दिग्दर्शन प्रसाद ओकचे आहे.



# निळू फुलेंच्या लेकीचं नव्या क्षेत्रात पाऊल

कृष्णाजी निळकंठ फुले म्हणजेच लोकप्रिय मराठी अभिनेते निळू फुले. करारी आवाज व दमदार अभिनयाने मराठी रसिक प्रेक्षकांच्या मनात निळू फुलेंनी अढळ स्थान निर्माण केलं. आज निळू फुले आपल्यात नाहीत, पण त्यांच्या असंख्य आठवणी चाहत्यांच्या मनात कायम आहे. त्याची लेक अभिनेत्री गार्गी फुले- थत्ते यांनी वडिलांकडून अभिनयाचा वारसा घेत कलाक्षेत्रात नाव कमावलं. अभिनय क्षेत्राबरोबरच राजकारणातही त्यानी हात आजमावला. आता कलाविश्वातून स्वेच्छा निवृत्ती घेत निळू फुलेंच्या लेकीनं नव्या क्षेत्रात पाऊल ठेवलं आहे. गार्गी यांना फिरण्याची प्रचंड आवड आहे. याच आवडीला जोपासत त्यांनी आता ट्रॅव्हलिंग ॲप लॉन्च केलं आहे. याबद्दल बोलताना त्या म्हणाल्या, अभिनयासोबतच फूड आणि ट्रॅव्हलिंग हे पॅशन होतं. काहीतरी वेगळं करावं असं सारखं वाटतं होतं. कलाक्षेत्रात असलेल्या लोकांनी उत्पन्नाचा दुसरा एक मार्ग ठेवावा. प्रवास आणि फूड आवडत असल्यानं मग त्याच्यासंदर्भात काहीतरी करण्याची इच्छा होती. काय होतं आपण स्वप्न खूप पाहतो. पण, ते पुर्ण करायला धाडस लागतं आणि आर्थिक पाठबळ लागतं. सुदैवानं मला तसा पार्टनर मिळाला आणि आम्ही दोघांनी मिळून हे सुरु केलं आहे. माझ्या बाबांनी मला प्रवासाची सवय लावली. आता हा नुसता प्रवास नाहिये. अनुभवांची शिदोरी आहे. या ट्रॅव्हलिंग ॲपचा उद्देशच हा आहे की प्रत्येकानं गोड अनुभन घेऊन जावं. कदाचित कडू अनुभवदेखील येईल. आमच्याकडूनही चुका होती. पण चुकभूल द्यावी, घ्यावी. तो प्रवास करावा. आयुष्यात राहिलेल्या ज्या गोष्टी असतात ना, त्या प्रवासात आपणच आपल्याला सापडत जातो. आमच्या टूरमधून एकांत मिळावा आणि माणूस म्हणून घडण्यात आमच्याकडून थोडासा हातभार लागावा. गार्गी 'झी मराठी' वाहिनीवरील 'तुला पाहते रे' मालिकेतून घराघरात पोहोचल्या. या मालिकेत त्यांनी साकारलेली ईशाची आई म्हणजेच पुष्पा निमकर ही भूमिका गाजली. त्यानंतर त्या 'राजा राणीची गं जोडी', 'सुंदरा मनामध्ये भरली', 'शुभविवाह' 'इंद्रायणी', 'थोडं तुझं आणि थोडं माझं' या मालिकांमध्ये झळकल्या आहेत. आता त्यांना या नव्या इनिंगसाठी चाहत्यांनी शुभेच्छांचा वर्षाव केलाय.

# आलियाला करायचंय शाहरुखसोबत काम



आलिया भट्ट आणि शाहरुख खान यांनी फक्त काही चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहे, परंतु आलियाला शाहरुखसोबत आणखी चित्रपट करण्याची इच्छा आहे. त्या दोघांनीही डिअर जिंदगीमध्ये एकत्र स्क्रीन स्पेस शेअर केली आहे आणि एकत्र एका चित्रपटाची सह-निर्मिती देखील केली आहे. आलिया आता तिचे चाहतेही या जोडीला मोठ्या पडद्यावर एकत्र पाहण्याची इच्छा बाळगत आहेत. अलिकडेच आलियाने शाहरुखसोबत पुन्हा पडद्यावर काम करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. मुंबईत झालेल्या फॅन मीट-अँड-ग्रीट कार्यक्रमादरम्यान आलियाने तिच्या चाहत्यांशी संवाद साधला. जेव्हा एका चाहत्याने तिला तिच्या स्वप्नातील सह-कलाकाराबद्दल विचारले की तिला पुन्हा कोणासोबत काम करायला आवडेल, तेव्हा आलियाने शाहरुख खानचे नाव घेतले. तिने शाहरुखची प्रशंसा केली आणि त्याच्या उपस्थितीबद्दल, अनुभवाबद्दल आणि प्रत्येक सेटवर तो आणत असलेल्या उर्जेबद्दल बोलली, ज्यामुळे आलिया किंग खानसोबत चित्रपट करण्यास उत्सुक असल्याचे स्पष्ट झाले. गौरी शिंदे दिग्दर्शित 'डिअर जिंदगी' या चित्रपटात शाहरुख खान आणि आलिया भट्ट यांनी त्यांच्या ऑनस्क्रीन जोडीने सर्वांचे मन जिंकले. चित्रपटात, आलियाने कैराची भूमिका साकारली होती, जी जीवनातील संघर्षांना तोंड देणारी एक तरुणी होती, तर शाहरुखने कैराला मदत करणाऱ्या डॉक्टर जुगची भूमिका साकारली होती. या चित्रपटाव्यतिरिक्त, आलियाने शाहरुखच्या 'झिरो' चित्रपटात एक छोटी भूमिका केली होती, तर शाहरुखने त्याच्या 'ब्रह्मास्त्र: पार्ट वन- शिवा' या काल्पनिक चित्रपटात एक विशेष भूमिका साकारली होती. याव्यतिरिक्त, ते आलियाच्या पहिल्या निर्मिती उपक्रम डार्लिंग्जसाठी निर्माते म्हणून एकत्र आले.



# आता 'या' सुपरस्टारसोबत झळकणार रश्मिका

साऊथ सिनेसृष्टीपासून बॉलिवूडपर्यंत आपला ठसा उमटवणारी रश्मिका मंदानाने अल्पावधीतच आपल्या अभिनयाने लोकांच्या मनात वेगळं स्थान निर्माण केलं आहे. रश्मिकाच्या जबरदस्त फॅन फॉलोइंगमुळे ती 'नॅशनल क्रश' झाली. पण तिला देशभरात खरी ओळख 'पुष्पा' सिनेमातून मिळाली. व्यावसायिक पातळीवर सध्या रश्मिकाचं करिअर चांगलंच सुरू आहे. बॉलिवूडचा भाईजान सलमान खानसोबत तिनं 'सिंकदर' चित्रपटात स्क्रीन शेअर केली आहे. आता 'सिंकदर'नंतर रश्मिका बॉलिवूडच्या आणखी एका सुपरस्टारसोबत झळकणार आहे. काही दिवसांपुर्वी रश्मिकाच्या पायाला दुखापत झाली होती. आता तिच्या दुखापतीत सुधार झाला असून ती कामावर परतली आहे. तिनं तिच्या नव्या सिनेमाचं शुटिंग सुरू केलं आहे. तिचा नवा चित्रपट आहे 'थामा'. या सिनेमात ती अभिनेता आयुषमान खुराणासोबत दिसणार आहे. जानेवारी २०२५ पर्यंत 'थामा' सिनेमाचं काही शुटिंग झालं होतं. पण, तिच्या पायाला दुखापत झाल्यानं वेळापत्रक पुढे ढकलण्यात आलं होतं. दीड महिन्याच्या विश्रांतीनंतर चित्रपट निर्माते आदित्य सरपोतदार यांनी पुन्हा शुटिंग सुरू केलं आहे. एप्रिलच्या अखेरीस मुंबईतील शुटिंग पूर्ण केल्यानंतर, टीम मे महिन्यापर्यंत उटीला रवाना होणार आहे. 'थामा' २०२५ च्या दिवाळीला प्रदर्शित होणार आहे. रक्तरंजित प्रेमकथा या सिनेमात दिसणार आहे. दिनेश विजन आणि अमर कौशिक यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे.

**बाजारपेठेचे बहुतांश नियम हिंदी चित्रपटसृष्टीलादेखील लागू होतात. 'मागणी तसा पुरवठा' हे तत्त्व तर हिंदी चित्रपटांना पूर्णांशाने लागू होतेच होते. 'मनोरंजनासाठीच कला' हे हिंदी चित्रपटसृष्टीचे ब्रीदवाक्य आहे. त्यामुळेच 'जो चलता है वोही बनता है' हा चित्रपट निर्मात्यांचा मूलमंत्र..!**

# दैव देते आणि दैवच नेते...

# मैं बाबू छैला...!

भारतीय स्वातंत्र्यानंतरच्या काळात, भारताच्या फाळणीमुळे झालेल्या उलथापालथीत, अनेक हिंदू, पश्चिम पंजाब, सिंध व बलुचिस्तान या प्रांतातून अक्षरश: नेसत्या वस्त्रांनिशी, कसाबसा जीव वाचवून भारतीय हद्दीत दाखल झाले. मुळातच स्वाभिमानी व कष्टाळू असल्यामुळे जिद्दीने त्यांनी 'शरणार्थी' ही ओळख अल्पावधीतच मिटवून टाकली.

१९५० च्या दशकात भारतात विशेषत: हिंदी चित्रपटसृष्टीत विशिष्ट प्रतिमा राखून असलेल्या व त्या प्रतिमेचे संवर्धन करणाऱ्या चित्रपटांमध्ये प्राधान्याने झळकणाऱ्या महानायकांचा उदय झाला. 'तोंडात सोन्याचा चमचा घेऊन जन्माला येणे' ही म्हण भारतात तरी बऱ्यापैकी प्रचलित आहे. 'जॉय मुखर्जी' हे त्याचे एक उत्तम उदाहरण. बॉम्बे टॉकीज, फिल्मीस्तान व फिल्मालय या निर्मिती संस्थांचे मातब्बर भागीदार शशधर मुखर्जी यांचा सुपुत्र असलेल्या जॉय मुखर्जी यांचा जन्म २४ फेब्रुवारी १९३९ रोजी झांशी (उत्तरप्रदेश) येथे झाला. त्यांचे सख्खे मामा म्हणजे अशोककुमार, अनुपकुमार व किशोरकुमार. बालपणापासून पाश्चात्त्य वळणाने वाढलेले जॉय मुखर्जी, नाईलाजास्तव हिंदी चित्रपटांमध्ये पदार्पण करते झाले. घरचीच चित्रपट निर्मिती संस्था व अभिनय प्रशिक्षण केंद्र, ताडमाड उंची, उत्तम शरीरयष्टी, देखणा चेहरा हे भांडवल असल्यामुळे वडिलांच्या इच्छेला मान देण्यासाठी त्यांनी घरच्याच 'लव्ह इन सिमला' (१९६०) या संगीतमय प्रणय चित्रपटातून हिंदी चित्रपटांमध्ये पदार्पण केले. या चित्रपटापासूनच साधना हिचीदेखील चित्रपट कारकीर्द प्रारंभ झाली. चित्रपट यशस्वी ठरला व जॉय मुखर्जी स्थिरावले. कारकीर्दीच्या सुरुवातीलाच त्यांना एक सत्य उमगले की, त्यावेळेसच्या चित्रपट निर्मिती प्रारूपात व त्यावेळेसच्या शैलीदार अभिनेत्यांच्या भाऊगर्दीत त्यांच्यासारख्या कोणतेही विशेष अभिनय गुण किंवा जनसामान्यांना भारून टाकणाऱ्या वैशिष्ट्यांचा अभाव असलेल्या नायकाचा टिकाव लागणार नाही म्हणून त्यांनी सदाबहार, शैलीबाज महानायक देव आनंदची नक्कल करणे सुरू केले. त्यात त्यांना यशदेखील मिळाले.

भारत-चीन संबंधांवर त्यांनी १९६६ साली 'हमसाया' हा संगीतमय चित्रपट निर्माण केला. त्याचे दिग्दर्शकदेखील ते स्वत: होते. चित्रपट साफ अयशस्वी ठरला व त्यांची अल्पजीवी कारकीर्द संपुष्टात आली. अर्थात, चित्रपटाचे ओ. पी. नय्यर यांनी दिलेले संगीत कालजयी ठरले. 'विनाशकाले विपरीत बुद्धी' या न्यायाने त्यांनी 'लव्ह इन बॉम्बे' या चित्रपटाची १९७१ साली निर्मिती केली. अशोककुमार, किशोरकुमार, रहेमान व वहिदा रहेमान अशी तगडी 'स्टार कास्ट' असलेला हा चित्रपट निर्मितीमध्ये बराच रेंगाळला व त्यासाठी घेतलेल्या कर्जापोटी जॉय मुखर्जी यांना दिवाळखोर करून गेला. त्यांच्यावर फसवणुकीसंदर्भात अनेक खटलेदेखील दाखल झाले. हताश व निराश जॉय मुखर्जी १९७७ साली प्रदर्शित झालेल्या 'छैला बाबू' चित्रपटाच्या यशाने सावरले. पण त्यांची कारकीर्द संपल्यातच जमा होती. १९८५ साली प्रदर्शित झालेले 'कहानी फुलवती की' व 'इन्साफ मै करूंगा' हे त्यांचे शेवटचेच चित्रपट. सर्व काही अनुकूल असूनही त्याचा फायदा ते घेऊ शकले नाही. बॉय व टॉय नावाचे त्यांचे सुपुत्रदेखील फारशी चमक दाखवू शकले नाहीत. नक्कल फक्त थोडक्या कालावधीसाठी यशस्वी ठरते, हेच खरे.





महानायकांची नक्कल करून आपली बहुतांश कारकीर्द करणारा असाच आणखी एक अभिनेता म्हणजे, मनोजकुमार म्हणजेच भारतकुमार! कुख्यात ओसामा बिन लादेनमुळे चर्चेत आलेल्या अबोटाबाद (वायव्य सरहद्द प्रांत, सध्या पाकिस्तानात) येथे २४ जुलै १९३७ रोजी जन्मलेल्या हरिकृष्ण गिरी गोस्वामीला भारताच्या फाळणीमुळे पाकिस्तानातून भारतात आश्रय घ्यावा लागला. त्यांच्यावर दिलीपकुमार यांच्या अभिनयशैलीचा गडद प्रभाव होता. 'शबनम' (१९४९) या चित्रपटातील दिलीपकुमार यांच्या व्यक्तिरेखेचे 'मनोजकुमार' हे नाव त्यांनी आपल्या हिंदी चित्रपटातील कारकीर्दीसाठी स्वीकारले. आपले नातेवाईक, लेखराज भाकडी यांच्या सहकार्याने त्यांनी हिंदी चित्रपटांमध्ये कसाबसा प्रवेश केला. 'फॅशन' (१९५७) या चित्रपटात भिकार्‍याची भूमिका करून त्यांनी आपल्या चित्रपट अभिनय कारकीर्दीचा श्रीगणेशा केला. सहारा, चांद, हनिमून या आता विस्मरणात गेलेल्या चित्रपटातील नगण्य भूमिका करून ते टिकून राहिले. 'कांच की गुडियां' (१९६१) या चित्रपटात त्यांना नायकाची भूमिका मिळाली. पिया मिलन की आस, रेशमी रुमाल इत्यादी 'ब' दर्जाच्या चित्रपटात त्यांनी नायकाच्या भूमिका केल्या; पण ते कोणाच्याही खिजगणतीत नव्हते. सतत एक महिना पिच्छा पुरवून त्यांनी जयकिशन यांना 'हरियाली और रास्ता' (१९६२) चित्रपटासाठी संगीत देण्यास राजी केले व त्यांची भाग्यरेखा उजळली. विजय भट्ट निर्मित व दिग्दर्शित हा चित्रपट यशस्वी ठरला व मनोजकुमार चित्रपटसृष्टीत स्थिरावले. 'शादी', 'डॉ. विद्या' व 'गृहस्थी' या लागोपाठच्या यशस्वी चित्रपटांनी त्यांचा बोलबाला होऊ लागला. त्यांना उदंड यश प्राप्त झाले ते राज खोसला यांच्या 'वो कौन थी' (१९६४) या चित्रपटाच्या खणखणीत यशाने. व्यावसायिक व संगीत या दोन्ही आघाड्यांवर चित्रपटाने लक्षणीय यश प्राप्त केले. त्यांचा उत्कर्ष सुरू झाला १९६५ या वर्षापासून. दिलीपकुमार यांची सहीनसही नक्कल करण्याचा त्यांचा सोस दिवसेंदिवस वाढतच होता. त्याचवर्षी आलेल्या 'गुमनाम' चित्रपटाच्या यशाने मनोजकुमार हे चलतीचे नायक म्हणून ओळखल्या जाऊ लागले. १९६६ मध्ये आलेल्या 'दो बदन' व 'सावन की घटा' या यशस्वी चित्रपटांनी त्यांचा भाव वधारला. पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या 'जय जवान, जय किसान' या घोषणेवर आधारित, त्यांचे दिग्दर्शकीय पदार्पण 'उपकार' यशस्वी ठरले. त्यांना 'भारतकुमार' म्हणून नवीन ओळख मिळाली. 'पत्थर के सनम (१९६७) 'नीलकमल' (१९६८), आदमी (१९६८). 'साजन' (१९६९) या चित्रपटाच्या यशाने राजेश खन्ना यांच्या झंझावातातही ते टिकून राहिले. १९९५ च्या 'मैदान-ए-जंग' हा त्यांचा अभिनेता म्हणून शेवटचा चित्रपट. १९९२ साली त्यांना 'पद्मश्री' पुरस्कार प्राप्त झाला, तर २०१६ सालचा 'दादासाहेब पुरस्कार' प्राप्त झाला.

अतिशय कुशलतेने ते देशभक्तीच्या आवरणाखाली रसिकांना हवे ते देण्यासाठी विख्यात होते. सभ्यतेच्या मर्यादेत या बाबीचा अधिक ऊहापोह करू शकत नाही. शिर्डीच्या साईबाबांवर त्यांची अमिट श्रद्धा होती व त्यांनी निर्माण केलेल्या प्रत्येक चित्रपटात साईभक्तीचा प्रत्यय येत असे. व्यावसायिक कौशल्याने केवळ नक्कल करून त्यांना यश मिळाले. अर्थात ते उत्तम संवाद लेखक, पटकथाकार, संकलक व गीतकार होतेच. पण तरीदेखील दिलीपकुमार नसते तर त्यांचे काय झाले असते, हा प्रश्न उरतोच. तूर्तास एवढेच..! (लेखक सिनेमाचे अभ्यासक आहेत.)

**- देवेंद्र प्रभुणे**




# उडता पंजाब २ वर काम सुरु

अभिषेक चौबे दिग्दर्शित 'उडता पंजाब' चित्रपटाचा सिक्वेल लवकरच प्रदर्शित होणार आहे. २०१६ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटात शाहिद कपूर आणि आलिया भट्ट मुख्य भूमिकेत होते. बातमीनुसार, निर्माती एकता कपूर या चित्रपटाची निर्मिती करत आहे. हा चित्रपट आकाश कौशिक लिहित आहेत. आकाश कौशिक 'हाऊसफुल ४' आणि 'भूल भुलैया २' लिहिण्यासाठी ओळखला जातो. आकाश कौशिक या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहेत. या चित्रपटाची कथा सध्या लिहिली जात आहे.

'उडता पंजाब'च्या सिक्वेलमध्ये एक नवीन कथा असू शकते. तथापि, 'उडता पंजाब' या जुन्या चित्रपटात फक्त ड्रग्जची कहाणी दाखवण्यात आली होती. या चित्रपटात महत्त्वाची भूमिका साकारणारा शाहिद कपूर एका महत्त्वाच्या भूमिकेत परतू शकतो.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एकता कपूर त्याला या चित्रपटासाठी साइन करू शकते. चित्रपटाची पटकथा तयार झाल्यानंतर, एकता कपूर शाहिद कपूरशी संपर्क साधू शकते असे म्हटले जाते. चित्रपटाचे चित्रीकरण पुढील वर्षी सुरू होऊ शकते.

'उडता पंजाब' चित्रपटात पंजाबमधील तरुण अनेकदा ड्रग्ज वापरतात हे दाखवण्यात आले आहे. चित्रपटात स्थलांतरित कामगारांची दुर्दशा दाखवण्यात आली आहे. प्रदर्शित झाल्यानंतर पंजाबमध्ये या चित्रपटावर बरीच टीका झाली. चित्रपटात चुकीच्या पद्धतीने चित्रित केल्याचा आरोप होता. पंजाबमध्ये, पंजाबचे लोक नाही तर उत्तर प्रदेश आणि बिहारमधील लोक जे तेथे मजूर म्हणून काम करण्यासाठी जातात ते ड्रग्जचे सेवन करतात.

'उडता पंजाब' हा चित्रपट अभिषेक चौबे यांनी दिग्दर्शित केला होता. या चित्रपटात शाहिद कपूर आणि आलिया भट्ट व्यतिरिक्त दिलजीत दोसांझ आणि करीना कपूर देखील होते. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर ९९ कोटींपेक्षा जास्त कमाई केली.




# परवीन बाबीच्या बायोपिकमध्ये तृप्ति

बॉलिवूडच्या दिग्गज अभिनेत्रींपैकी एक परवीन बाबी यांचा बायोपिक तयार केला जात आहे. ७० च्या दशकातील आघाडीच्या अभिनेत्री परवीन बाबी यांची प्रोफेशनल कारकीर्द अत्यंत प्रभावी राहिली. परंतु त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात अनेक उतारचढाव दिसून आले. आता त्यांच्यावर एक बायोपिक तयार केला जात असून यात परवीन यांची भूमिका तृप्ति डिमरी ही अभिनेत्री साकारणार आहे. तृप्तिने या चित्रपटाच्या चित्रिकरणासाठी तारखा निश्चित केल्याचे समोर आले आहे. परवीन बाबी यांच्या बायोपिकचे दिग्दर्शन सोनाली बोस करणार आहे. सोनाली बोस यांनी याच्या चित्रिकरणाची तयारी सुरू केली आहे. परवीन बाबींचा हा बायोपिक थेट ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे. नेटफ्लिक्सने या चित्रपटाचे अधिकार विकत घेतल्याचे समजते. अद्याप याच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर करण्यात आलेली नाही. अमर अकबर एंथनी, काला पत्थर आणि सुहाग यासारख्या चित्रपटांमध्ये दिसून आलेल्या परवीन बाबी यांची कारकीर्द अत्यंत यशस्वी राहिली, परंतु त्यांचे वैयक्तिक आयुष्य दु:खपूर्ण राहिले. निधनापूर्वी त्या मानसिक समस्येला सामोर्‍या जात होत्या. महेश भट्ट आणि कबीर बेदी यासारख्या कलाकारांसोबत नात्यामुळे त्या चर्चेत राहिल्या होत्या. २००५ मध्ये त्यांचे निधन झाले होते.

# वरुण करणार वडिलांसोबत एकत्र काम

अभिनेता वरुण धवनने अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे. अल्पावधीतच आपल्या अभिनय आणि स्टाइलच्या जोरावर त्याने अनेकांची मनं जिंकली. सध्या त्याच्या आगामी प्रोजेक्टविषयी एक माहिती समोर आली आहे. वरुण त्याचे वडील डेव्हिड धवन यांच्यासोबत एका प्रोजेक्टमध्ये काम करणार आहे. मात्र अद्याप या शीर्षक निश्चित करण्यात आलेले नाही.



वरुण आता चित्रपटाच्या पुढील वेळापत्रकाची तयारी करण्यात व्यस्त आहे, ज्याचे चित्रीकरण उत्तराखंडमध्ये होणार आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण झाल्यानंतर वरुण दक्षिणेतील अभिनेत्री श्रीलीलासोबत एका रोमँटिक चित्रपटात दिसणार आहे. डेव्हिड धवन दिग्दर्शित हा त्याचा वरुण धवनसोबतचा चौथा चित्रपट असेल. याआधी दोघांनी 'मैं तेरा हिरो' (२०१४), 'जुडवा २' (२०१७) आणि 'कुली नंबर १' (२०२०) मध्ये एकत्र काम केले आहे. चित्रपटाशी संबंधित एका जवळच्या सूत्राने सांगितले की, चित्रपटाची टीम लंडनमध्ये शुटींग करणार आहे. यामध्ये अनेक प्रसिद्ध ठिकाणांचा समावेश असेल. या चित्रपटाचे चित्रीकरण या वर्षी मे महिन्यापासून सुरू होऊ शकते. सध्या वरुण १९९७ मध्ये आलेल्या 'बॉर्डर' चित्रपटाच्या सिक्वेलवर काम करत आहेत. या चित्रपटात सनी देओल, वरुण धवन आणि दिलजीत दोसांझ सारखे कलाकार आहेत.





# दीपिकामुळे प्रियंकाच्या हातून निसटला 'रामलीला'

संजय लीला भन्साळी यांचा २०१३ साली रिलीज झालेला 'गोलियों की रासलीला: रामलीला' सर्वाधिक चर्चेत असलेला चित्रपट होता. यामध्ये रणवीर सिंग आणि दीपिका पादुकोण मुख्य भूमिकेत होते. प्रियंका चोप्राचं आयटम साँगही खूप गाजलं. तुम्हाला माहीत आहे का की दिग्दर्शकाने सुरवातीला दोन इतर अभिनेत्रींना फिमेल लीडसाठी शॉर्टलिस्ट केले होते. करीना कपूरच्या नकारानंतर प्रियंका चोप्राने लीलाच्या भूमिकेसाठी होकार दिला. मात्र, नंतर शेवटच्या क्षणी दीपिकाने तिची जागा घेतली. त्यानंतर प्रियंकाने 'राम चाहे लीला' हे आयटम साँग केले.

प्रियंका चोप्राची आई मधु चोप्रा यांनी नुकतेच एक मुलाखत दिली. यावेळी त्यांनी खुलासा केला की, संजय लीला भन्साळींवर प्रियंका नाराज नव्हती आणि रिप्लेस झाल्यानंतरही खूप खूश होती. मधु चोप्रा यांनी सांगितले की, मला याबद्दल जास्त काही आठवत नाही. मला फक्त इतकेच माहित आहे की मी माझ्या रूग्णांसह माझ्या क्लिनिकमध्ये असताना, ती शेजारच्या ऑफिसमध्ये गेली. जेव्हा ती परत आली तेव्हा तिने सांगितले की मी 'रामलीला'मध्ये फक्त एक गाणे करत आहे. मी तिला विचारलं, 'काय झालं?' 'मला वाटते ते अधिक चांगले आहे. मधु चोप्रा पुढे म्हणाल्या की, 'प्रियंकाने काळजीपूर्वक विचार करून निर्णय घेतला असण्याची शक्यता आहे. कदाचित त्यांच्यात काही चांगली चर्चा झाली असेल आणि तिने असे काहीतरी मान्य केले कारण ते अजूनही मित्र आहेत. जेव्हा होस्टने भन्साळी यांच्याबद्दल सांगितले की, प्रियंकाला मेरी कॉमचा विचार कर सांगण्यासाठी संकोच करत होते. कारण तिला 'रामलीला'मध्ये कास्ट न केल्याबद्दल ती अजूनही रागावली होती, यावर तिची आई म्हणाली, 'तिच्याकडे सूडाची वृत्ती नाही. संजय यांनी तिला तसे करण्यास सांगितले म्हणून तिने हा चित्रपट केला. ओमंग दिग्दर्शक होते आणि ती सर्वकाही पाहण्यासाठी काही काळ मेरी कोमसोबत राहिली होती.'

